## प्रसिध्दी पत्रक

**श्री.दत्तात्रय साहेबराव बुकन, वय 43 वर्ष, वरिष्ठ सहाय्यक, जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय, लघु पाटबंधारे , जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी 14,000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | श्री.दत्तात्रय साहेबराव बुकन, वय 43 वर्ष, वरिष्ठ सहाय्यक, जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद, उस्मानाबाद |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.07.11.2020 रोजी जिल्हा परिषद कार्यालयाचे बाजुच्या समता नगरमध्ये जाणारे रोडवरील पानटपरीवर |
| तपासी अधिकारी | श्री.ए.एच.हुलगे, पोलीस निरीक्षक |
| लाचेची रक्कम मागणी | 25000/- रु लाचेची मागणी करुन यापुर्वी 11,000/- रु स्विकारुन उर्वरीत 14000/- रु लाचेची मागणी |
| लाच मागण्याचा हेतु | कार्यालयीन टिपणी तयार करुन त्यावर मा.उच्च न्यायालय येथे जि.प.चे नेमलेले वकील यांचा होकारार्थी अभिप्राय त्यांचे ओळखीने घेऊन होकारार्थी टिपणी तयार करुन कक्ष अधिकारी यांचेकडे पाठविण्यासाठी |

यातील तक्रारदार हे सेवानिवृत्त असुन ते महाराष्ट्र राज्य स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संघाचे केंद्रीय उपाध्यक्ष आहेत. जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद, उस्मानाबाद या कार्यालयातील 3 कर्चमारी सेवानिवृत्त झाले होते त्यांचा मागील वेतनाचा फरक न मिळाल्याने त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन दाखल केले होते. मा.न्यायालयाने 4 महिन्यात वेतना संबंधाने निर्णय घेणे बाबत आदेश दिले होते. तक्रारदार संघ उपाध्यक्ष या नात्याने तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांनी तक्रारदार यांना दिलेल्या अधिकारपत्रावरुन ते लोकसेवक यांचेकडे पाठपुरावा करीत होते. त्यावरुन जिल्हा जल संधारण, लघु पाटबंधारे कार्यालय, जिल्हा परिषद उस्मानाबाद येथील लोकसेवक बुकन, वरिष्ठ सहाय्यक हे तक्रारदारकडे कार्यालयीन टिपणी तयार करुन त्यावर मा.उच्च न्यायालय येथे जि.प.चे नेमलेले वकील यांचा होकारार्थी अभिप्राय त्यांचे ओळखीने घेऊन होकारार्थी टिपणी तयार करुन कक्ष अधिकारी यांचेकडे पाठविण्यासाठी 25000/- रुपये लाचेची मागणी करुन 5 दिवसापुर्वी 11000/- रु स्विकारुन उर्वरीत 14000/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्री. बुकन, वरिष्ठ सहाय्यक यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.06.01.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथे पोलीस उप अधीक्षक श्री. रविंद्र थोरात यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्री.बुकन, वरिष्ठ सहाय्यक यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कारणासाठी 2 दिवसापुर्वी 25000/- रु लाचेची मागणी करुन 11000/- रु रक्कम स्विकारली होती व आज रोजी उर्वरीत 14000/-रुपये लाचेची मागणी करुन 14000/- रु लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.07.01.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता **श्री.दत्तात्रय साहेबराव बुकन, वरिष्ठ सहाय्यक,** यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 14000/- रुपये लाच रक्कम स्वतः स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंद नगर, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अरविंद चावरीया, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.रविंद्र थोरात, पोलीस उप अधीक्षक व श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, सपोफौ/सर्जे, पोह/उपगलमुगले, पोह/कठारे, पोना/डंबरे, जाधव, मारकड , पोशि/बेळे, पवार,शिंदे व चालक कांबळे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

1) मा.श्री.अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8530255500

2) श्री.रविंद्र भा.थोरात, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9823215195,

3) **टोल फ्री क्र. 1064,** दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-**dyspacbosmanabad@mahapolice.gov.in, 2)dysposmanabad@gmail.com

(आर.बी.थोरात)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.

कार्यालय पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद

Scanned by CamScanner